# डे. ए. सो. चे
# बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स , पुणे -४
# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना २०२३-२४
# सूचना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध या जातीतील विद्यार्थ्यांकरिता भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना २०२३-२४ समाज कल्याण विभागामार्फत राबविली जात आहे. सदर योजनेच्या अटी व पात्रता खालील प्रमाणे दिलेल्या आहेत. अशा पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन https://swadhar.acswpune.com या वेबसाईट वर रजिस्ट्रेशन करून अर्ज भरावा व ऑफ लाईन अर्ज भरून योग्य ती कागदपत्रे जोडून दि. २० डिसेंबर, २०२३ पर्यंत सकाळी १०.३० ते १.०० या वेळेत महाविद्यालयाच्या कार्यालयात श्रीमती बोऱ्हुडे यांचे कडे जमा करावी.

## पात्रता

१) सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थी अनुसूचित जाती व नवबौद्ध या प्रवर्गाचा विद्यार्थ्याला घेता येईल त्याने जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल

२) सदर विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३) विद्यार्थ्यांने त्याचा स्वतःचा आधार क्रमांक त्याने ज्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत खाते उघडले आहे त्या खात्याशी सलग्न करणे बंधनकारक असेल.

४) विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु. २,५०,०००/- (अक्षरी दोन लाख पचास हजार पेक्षा जास्त नसावे) विद्यार्थी स्थानिक नसावा.( विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या ठिकाणी आहे अशा ठिकाणचा विद्यार्थी रहिवासी नसावा.)

५) विद्यार्थी इ.११वी, १२ वी व त्या नंतरच्या दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसलेल्या अभ्यासक्रमासाठी उच्च शिक्षण घेणारा असावा.

६) इ.११वी, १२ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास १० वी मध्ये किमान ५०% गुण असणे आवश्यक असेल. ७) दोन वर्षापेक्षा कमी कालावधी नसणाऱ्या कोणत्या हि मान्यता प्राप्त अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक वर्षी किमान ५०% गुण व त्या प्रमाणात ग्रेडेशन / CGP- चे गुण असणे आवश्यक राहील.

८) इ. १२ वी नंतर पदविका, पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारा अभ्यासक्रम हा दोन वर्षापेक्षा कमी आणि पदवीनंतर पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाचा कालावधीही दोन वर्षापेक्षा कमी नसावा.

९) विद्यार्थ्याची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल. निवडलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील.

१०) या योजनेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यासाठी ३% आरक्षण असेल. दिव्यांग विद्यार्थ्यासाठी गुणवतेची किमान टक्केवारी ची मर्यादा ४०% इतकी राहील

११) प्रवेशित विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र परीक्षेचा निकालाची प्रत निकाल लागल्यापासून १५ दिवसाच्या आत नेमून दिलेल्या कार्यालयात सादर करणे बंधनकारक.

१२) सदर योजनेचा लाभ प्रवेशित अभ्यासक्रमाच्या कालावधी पर्यंतच देय राहील. या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना एकूण शैक्षणिक कालावधीत जास्तीत जास्त ७ वर्षापर्यंत घेता येईल.

१३) विद्यार्थ्याने खोटी माहिती व कागदपत्रे देऊन सदर योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करत असल्यास अथवा इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर निदर्शनास आल्यास तो कारवाईस पात्र राहील. तसेच त्यास दिलेल्या रक्कमेची १२% व्याजासह वसुली केली जाईल.

१४) या योजनेचा लाभ मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी किमान ५० % गुण मिळविणे अनिवार्य आहे अन्यथा तो या योजनेस अपात्र होईल.

## स्वाधार योजनेसाठी आवश्यक असणारे कागदपत्रे

१. स्वाधार योजनेचा अर्ज -२०२३-२४ (अर्जावर शेवटच्या पानावर विद्यार्थ्याची व पालकाची नाव व सही करणे आवश्यक)
२. कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला ( २०२२-२३ चा तहसीलदार यांनी दिलेला)
३. रहिवासी / डॉमिसाईल प्रमाणपत्र (तहसीलदार यांनी दिलेला)
४. विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र
५. आधार कार्ड प्रत
६. इ.१० वी,इ.१२वी किंवा पदवी परीक्षेचे गुणपत्रक (किमान ५०%गुण आवश्यक)
७. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र
८. महाविद्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र (किमान ७५% )

९. बँक पासबुक झेरॉक्स
१०. बँक खाते आधार क्रमांकाशी सलग्न केला बाबतचा पुरावा (बँकेचे प्रमाणपत्र)
११. विद्यार्थी सद्या राहतो त्याबाबतचा पुरावा (खाजगी वसतिगृह , भाडे करारनामा इ.)
१२. अ शपथपत्र १ विद्यार्थ्यानि कोणत्याही शासकीय वसतीगृहात प्रवेश घेतला नसल्या बाबतचे शपथपत्र
ब शपथपत्र २ स्थानिक रहिवासी नसल्या बाबतचे प्रमाणपत्र शपथपत्र
क शपथपत्र ३ नोकरी / व्यवसाय करीत नसले बाबतचा पुरावा / उल्लेख
ड शपथपत्र ४ आई वडिलां सोबत/ कुटुंबासोबत राहत नसल्याबाबतचे शपथ पत्र
१३. पुणे / पिंपरी – चिंचवड महानगर हद्दी पासून महाविद्यालय अंतर ५ कि.मी. परिसरात असल्याबाबत
१४. दिव्यांग विद्यार्थी असल्यास त्या बाबतचे प्रमाणपत्र (३% राखीव)

दिनांक : ५.१२.२०२३

प्र. प्राचार्य

प्रभारी प्राचार्य
बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय
(स्वायत्त)
पुणे-४११००४.